# परिशिष्ट ब

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-

१. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील
२. ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज
   a. www.mpcb.gov.in
   b. http://oasis.mkcl.org/mpcb2014

   या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

   ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक :-

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याचा कालावधी | ०६/०८/२०१६ | २१/०८/२०१६ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)/ॲक्सिस बँक (Axix Bank) यांच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | ०६/०८/२०१६ | १९/०८/२०१६ |
| ३ | ज्या उमेदवाराने बँकेमध्ये दिनांक १९/८/२०१६ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | २१/०८/२०१६ | |

१. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळावर व म.प्र.नि.मंडळाच्या http://mpcb.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCL यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ शकतील.

२. उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्व प्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registration) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

३. नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form Number ) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

४. त्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

५. या प्रिंट केलेल्या बँक चलनावर नमूद फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI Bank)/ॲक्सिस बँक (Axis Bank) यांच्या कोणत्याही शाखेमध्ये तक्त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. शुल्क भरणा केल्याबाबत चलनाची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावी.

६. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI Bank) बँकेत फी भरल्यानंतर दुसऱ्या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरित अर्ज भरावा. ॲक्सिस (Axis Bank) बँकेत फी भरल्यास अर्ज त्याच दिवशी भरता येईल.

७. उर्वरित अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा नवीनतम (Latest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८. उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेऊन स्वत:जवळ ठेवावी.

९. वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षेस पात्र होईल.

१०. उमेदवारांच्या माहिती व मदतीसाठी MKCL यांच्या कॉल सेंटरवरील दूरध्वनी क्रमंक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

११. उमेदवाराने ऑनलाइन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ईमेल आय.डी. असल्यास नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.